दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १७१ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार, दि.२५ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोलोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# पहलगामच्या दोषींना कल्पनेपेक्षाही मोठी शिक्षा होईल

## दहशतवाद्यांना मातीत गाडण्याची वेळ आली आहे–पंतप्रधान मोदी




**मधुबनी (वृत्तसंस्था)**–पहलगाम हल्ल्यानंतर गुरुवारी बिहारमधील मधुबनी येथे पोहोचलेले पंतप्रधान मोदी म्हणाले, 'पहलगामच्या गुन्हेगारांना दफन करण्याची वेळ आली आहे. दहशतवाद्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षा मोठी शिक्षा मिळेल.'दहशतवादी हल्ल्यात कोणीतरी आपला मुलगा गमावला, कोणीतरी आपला भाऊ गमावला, कोणीतरी आपला जीवनसाथी गमावला.' त्यापैकी काही बंगाली बोलत होते, काही कन्नड, काही गुजराती, तर काही बिहारचे होते. आज, कारगिलपासून कन्याकुमारीपर्यंत, सर्वांच्या मृत्यूबद्दल आपला राग सारखाच आहे.पहलगाम दहशतवादी हल्ल्याबद्दल जगाला संदेश देण्यासाठी, पंतप्रधान मोदींनी व्यासपीठावरून इंग्रजीत म्हटले, 'आम्ही त्यांना पृथ्वीच्या शेवटच्या कोपऱ्यात हाकलून लावू.' दहशतवादामुळे भारताचा आत्मा कधीही तुटणार नाही. दहशतवादाला शिक्षा होईल.'न्याय सुनिश्चित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील.' या संकल्पात संपूर्ण देश एक आहे. मानवतेवर विश्वास ठेवणारा प्रत्येक माणूस आपल्यासोबत आहे. आमच्यासोबत उभे राहिलेल्या विविध देशांच्या जनतेचे आणि त्यांच्या नेत्यांचे मी आभार मानतो.पंतप्रधान मोदी म्हणाले, 'जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी ज्या प्रकारे निष्पाप लोकांना मारण्यात आले. संपूर्ण देश यामुळे त्रस्त आहे. त्यांच्या दुःखात संपूर्ण देश त्यांच्यासोबत उभा आहे.'सध्या उपचार घेत असलेले लोक लवकर बरे व्हावेत यासाठी सरकार प्रयत्न करत आहे.' मी हे स्पष्टपणे सांगू इच्छितो की, हल्लेखोरांना आणि त्यांना मदत करणाऱ्यांना तुम्ही कल्पना करू शकत नाही त्यापेक्षाही वाईट शिक्षा मिळेल.पंचायती राज कार्यक्रमात सहभागी झालेल्या पंतप्रधानांनी मंचावरून मृतांना श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले, 'माझे भाषण सुरू करण्यापूर्वी, मी तुम्हा सर्वांना एक प्रार्थना करू इच्छितो.'तुम्ही कुठेही असलात तरी, तुमच्या जागी बसून, २२ तारखेला गमावलेल्या कुटुंबातील सदस्यांची आठवण आपण करू शकतो. आपण त्याला श्रद्धांजली अर्पण करू. यानंतर मी माझे भाषण सुरू करेन.

### ४५ अंश तापमान, तरीही उमा नदीसाठी समर्पित उपक्रम

## गौरव शामकुले यांचा वाढदिवस 'स्वच्छता उत्सवात' रूपांतरित

**मूल । प्रतिनिधी**



उन्हाच्या तीव्रतेने संपूर्ण मूल शहर तापत असतानाही, समाज आणि पर्यावरणासाठी काहीतरी विधायक करण्याची जाणीव मनात बाळगून स्वच्छता मित्र गौरव शामकुले यांनी आपला वाढदिवस एका अनोख्या पद्धतीने साजरा केला. केक, फुगे, पार्टी वा गाजावाजा न करता त्यांनी थेट उमा नदीच्या स्वच्छतेचा संकल्प करत स्वतःच स्वच्छता मोहीम राबवली.

त्या दिवशी तापमान ४५ अंश सेल्सियसवर पोहोचले असतानाही गौरव शामकुले यांनी सकाळपासूनच नदीकाठ गाठला. आपल्या सहकाऱ्यांसह – बबलू गेडाम यांच्यासारख्या कार्यकर्त्यांचा सहभाग घेत – त्यांनी उमा नदीच्या परिसरातील कचरा गोळा केला, प्लास्टिक हटवले आणि नागरिकांमध्ये नदी संवर्धनाबाबत जनजागृती केली.गौरव यांचा हा उपक्रम केवळ वैयक्तिक उपक्रम न राहता सामाजिक बांधिलकीचे प्रतीक ठरला आहे. वाढदिवस हा फक्त स्वतःसाठी नसावा, तर समाजासाठीही काही देणं लागतं, या विचारातून प्रेरित होऊन त्यांनी 'स्वच्छ नदी, सुंदर परिसर' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या या कार्यातून युवकांना सामाजिक बांधिलकीची जाणीव होण्यास मदत होईल, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले.पर्यावरण संवर्धनाची गरज वाढत असताना, अशा प्रकारचे उपक्रम ही काळाची गरज बनली आहेत. गौरव शामकुले यांनी यशस्वीरित्या दाखवून दिले की, एकट्याचाही बदल घडवण्यामागे प्रबळ इच्छाशक्ती असेल, तर ती समाजात सकारात्मक संदेश पोहोचवू शकते.उष्णतेची तमा न बाळगता नदी स्वच्छतेसाठी उचललेले हे पाऊल गौरव यांचा वाढदिवस एका सच्च्या 'स्वच्छता उत्सवात' रूपांतरित करणारा ठरला आहे.

## कोल्हार परिसरात लोणी पोलिसांचे सकाळी सर्च ऑपरेशन

### वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर मोठी कारवाई

**कोल्हार । प्रतिनिधी**



कोल्हार भगवतीपूर परिसरात वाहतुकीचे नियम धाब्यावर ठेवणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी लोणी पोलिस स्टेशनच्या वतीने आज पहाटे ५.३० वाजल्यापासूनच व्यापक स्वरूपात सर्च ऑपरेशन राबवण्यात आले. ट्रिपल सीट, काळ्या काचा, कर्णकर्कश सायलेंसर, विना नंबर प्लेट वाहनं चालवणाऱ्यांवर तसेच इतर वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर थेट दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.

सदर कारवाई कोल्हार येथील अंबिका नगर चौक, वंदे मातरम चौक, तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक, बेलापूर रोड या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राबवण्यात आली. यावेळी कॉलेजकडे जाणाऱ्या ट्रिपल सीट युवकांना अडवून कागदपत्रांची चौकशी करण्यात आली. नियम मोडणाऱ्यांकडून दंड वसूल करण्यात आला तर काहींना समज देऊन सोडण्यात आले.वाहनचोरी आणि पेट्रोल चोरीचे प्रमाण वाढल्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक शिस्त निर्माण करण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे लोणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.या कारवाईत एकूण ३६ वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली असून ३४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याचे वाघ यांनी यावेळी स्पष्ट केले. बेशिस्त वाहनचालकांचे प्रमाण कमी न झाल्यास भविष्यात यापेक्षाही कठोर पावले उचलण्यात येतील, असा इशाराही त्यांनी दिला.सदर ऑपरेशन माननीय डझ ओळा साहेब यांच्या आदेशान्वये तसेच अप्पर पोलीस निरीक्षक वैभव कलुगर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आले. या कारवाईत लोणी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक देवराम वनवे, PSI अजिंक्य चौधरी, PSI सुरेश पवार, ASI आव्हाड, हेडकॉन्स्टेबल दिनकर चव्हाण, भाऊसाहेब आव्हाड, निवृत्ती साळवे, सचिन शेवाळे, नऱ्हे व वर्पे सहभागी होते.

### पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला

## 'लघुस्वित्झर्लंड' रक्तरंजित; २६ ठार, टीआरएफ ने स्वीकारली जबाबदारी



**शिरूर । रमेश बनसोडे**

जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या पहलगामच्या शांततेला मंगळवारी दुपारी झालेल्या दहशतवादी हल्ल्याने जबर हादरा दिला. बैसरन दरीतील पर्यटकांच्या गटावर 'द रेझिस्टंट फ्रंट' या दहशतवादी संघटनेच्या सदस्यांनी गोळीबार केला. या क्रूर हल्ल्यात २६ जण ठार झाले असून १७ जण जखमी झाले आहे आहेत.

दुपारी सुमारे २ वाजून ४५ मिनिटांनी दहशतवाद्यांनी बैसरन दरीमध्ये पर्यटकांवर अचानक हल्ला चढवला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी पर्यटकांना जमिनीवर बसवून त्यांची नावे विचारली आणि नंतर 'एके–४७' रायफलमधून बेधुंद गोळीबार केला. उपहारगृहाजवळ, घोडेस्वारीला गेलेले आणि गिरिभ्रमण करणारे पर्यटक या गोळीबाराचे बळी ठरले.

'द रेझिस्टंट फ्रंट' (टीआरएफ) या लष्कर–ए–तैयबाशी संबंधित दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. सैफुल्ला खालिद हा टीआरएफचा उपप्रमुख असून हल्ल्यामागे त्याचं मुख्य सूत्रधारत्व असल्याचं स्पष्ट झालं आहे. संशयितांमध्ये आसिफ फौजी, सुलेमान शहा आणि अबू तल्हा यांचा समावेश आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सौदी अरेबियातून परतल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल व परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांच्यासोबत तातडीची बैठक घेतली. केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी श्रीनगरमधील पोलिस नियंत्रण कक्षात उपस्थित राहून मृतांना श्रद्धांजली वाहिली.

मृतांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये, गंभीर जखमींना २ लाख आणि किरकोळ जखमींना १ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेचे (एनआयए) पथक तपासासाठी पहलगाममध्ये दाखल झाले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आपला अमेरिकेतील दौरा अर्धवट सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला आहे.पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या पहलगाममध्ये असा हल्ला होणे ही केवळ काश्मीरसाठी नव्हे तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेसाठी गंभीर बाब आहे. अशा कृत्यांविरुद्ध देशवासीयांनी एकत्रितपणे कठोर पवित्रा घेणे अत्यावश्यक ठरते.

## चंद्रपूर जिल्ह्यात उष्णतेचा कहर; मुल तालुक्यातील शाळांना तत्काळ सुट्टी जाहीर करा–भाजप युवा मोर्चाची मागणी

**मुल । प्रतिनिधी**



चंद्रपूर जिल्ह्यात सध्या प्रचंड उष्णतेचा कहर सुरू असून तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर गेले आहे. या तीव्र उष्णतेचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर घातक परिणाम होऊ शकतो, याची गंभीर दखल घेत भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा, मुल यांच्या वतीने आमदार डॉ. सुधीर मुनगंटीवार यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये मुल तालुक्यातील सर्व शाळा, खाजगी शिक्षणसंस्था (कॉन्वेंट), तसेच महाविद्यालयांना तातडीने सुट्टी जाहीर करावी किंवा शालेय वेळांमध्ये आवश्यक बदल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. उष्णतेमुळे उष्णाघात, अंगात पाणी कमी होणे (निर्जलीकरण) अशा आरोग्यविषयक समस्या विद्यार्थ्यांना होण्याची शक्यता असून, प्रशासनाने तत्काळ निर्णय घेणे गरजेचे आहे, असे युवा मोर्चाचे राकेश ठाकरे यांनी स्पष्ट केले.या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडेही पाठवण्यात आली आहे.निवेदन देताना नंदूभाऊ रणदिवे, मिलिंद खोब्रागडे, मुन्ना कोटगले (बेंबाळ), मनोहर मेश्राम (मूल), रुपेश अल्लीवार (चांदापूर), रुपेश गड्डमवार (बेंबाळ), धीरज पाल (चांदापूर), सुधाकर गोहने (बेंबाळ) आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा वैजापूरमध्ये तीव्र निषेध

**वैजापूर । अर्जुन शिंदे**




जम्मू–कश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला असून, या हल्ल्यात २८ निष्पाप पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अमानवी कृतीविरोधात देशभरातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

वैजापूरमध्येही या घटनेच्या निषेधार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी काळ्या फिती लावून निदर्शने करत सरकारचे लक्ष वेधले. आंदोलनादरम्यान पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी करत केंद्र सरकारने दहशतवाद्यांना कठोर प्रत्युत्तर द्यावे, अशी जोरदार मागणी करण्यात आली.या आंदोलनात तालुकाप्रमुख राजेंद्र साळुंके, माजी नगराध्यक्ष साबेर खान, डॉ. राजेंद्र डोंगरे, पारस घाटे, अमीर अली, राहुल शेळके, शंकर मुळे, वल्लभ सोनवणे, संतोष वाघ, नगरसेवक सकाहारी बर्डे, नानासाहेब जगताप, श्रीकांत साळुंके, गणेश पवार, कपिल खैरे यांच्यासह अनेक महिला आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# २० वर्षांनंतर गाठीभेट; माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

# उद्योगपती भिसे यांच्याकडून शाळेसाठी १० टन सिमेंट देणगी

**अहिल्यानगर । वजीर शेख**

पाथर्डी तालुक्यातील पाडळी येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे २००४/२००५ या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. तब्बल २० वर्षांनंतर शाळा, शिक्षक आणि बालमित्रांना भेटण्याचा हा अविस्मरणीय क्षण होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद सेवा निवृत्त शिक्षक लक्ष्मण भापकर यांनी भूषवले.मंचावर मुख्याध्यापक विनायक कचरे , अर्जुन चितळे, विठ्ठल चितळे , मरकड , कारखेले, युनुस शेख, आणा आमटे , विष्णु कचरे , पवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व राष्ट्रगीताने झाली. यानंतर सर्व गुरुजनांचा सन्मान करण्यात आला.

विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या वेळी उद्योगपती ज्ञानेश्वर भिसे यांनी शाळेच्या विकासकामांसाठी १० टन सिमेंट देण्याची घोषणा केली. त्यांच्या या जाहीर घोषणेला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपापला परिचय दिला. अनेकजण आज डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, ग्रामसेवक, तलाठी, तर काहीजण यशस्वी उद्योजक या नात्याने विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शाळेतील शिक्षणामुळेच हे यश शक्य झाले, असे नमूद केले.

कार्यक्रमात सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण केले. ही बॅच कधीच विसरणार नाही, असे गौरवोद्गार अध्यक्ष भापकर सरांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. विद्यार्थ्यांची शिस्त, आत्मीयता आणि प्रेम पाहून त्यांना समाधान व अभिमान वाटल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमात संतोष गर्जे, डॉ. संतोष कचरे, अतुल पंडागळे, प्रियांका केदार, सुनिता चितळे व ज्ञानेश्वर भिसे यांनीही आपली मनोगते व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानेश्वर भिसे व शरद कराळे यांच्या पुढाकारातून करण्यात आले. सूत्रसंचालन सुवर्णा गर्जे आणि ज्योती भिसे यांनी तर आभार प्रदर्शन दत्ता गर्जे यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व माजी विद्यार्थी दहावीच्या वर्गात एकत्र आले व भापकर सरांना एक तास घेण्याची विनंती केली. सरांनीही स्मशानातील सोनं हा पाठ शिकवून सर्वांना जुन्या दिवसांची आठवण करून दिली. या भावनिक क्षणानंतर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



# श्रीकांत शिंदेंचं धाडसी नेतृत्व

## एक कॉल, एक निर्णय आणि २२ जणांची श्रीनगरहून सुरक्षित सुटका!

**कधी कधी एक छोटा मेसेज मोठा बदल घडवतो. श्रीनगरमध्ये अडकलेल्या आपल्या भागातील २२ जणांच्या सुटकेसाठी असंच काहीसं घडलं.युवासेना कार्यकारणी सदस्य हर्षल शिंदे यांनी एक मेसेज पाठवला सर, आमचे लोक श्रीनगरमध्ये अडकलेत. हा मेसेज मिळताच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी एक क्षणही न गमावता पुढाकार घेतला.तेव्हा श्रीकांत शिंदे यांनी तात्काळ त्यांच्या पीए अभिजीत दरेकर यांना श्रीनगरला रवाना केलं. त्याच वेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील श्रीनगरमध्ये होते. त्यांनी परिस्थितीचं गांभीर्य ओळखून सर्व सरकारी यंत्रणांना तात्काळ मदतीचे आदेश दिले.**



ही सगळी मंडळी श्रीनगरमधील एका मिलिटरी कॅम्पमध्ये अडकलेली होती. त्यांच्या सुरक्षिततेसाठी हा कॅम्प उभारण्यात आला होता, पण त्यांना तिथून बाहेर काढणं तितकंसं सोपं नव्हतं.

ज्ञानेश्वर जुमडे, रेखा जुमडे, श्रावणी जुमडे, संयोग जुमडे, मोहन जुमडे, अनिता जुमडे, अनुरुद्ध जुमडे, नक्श जुमडे, मंजुदाबाई जुमडे, भागीरथ मुसाडे, संतोष भोक्रे, ममता भोक्रे, वंशिका भोक्रे, अत्रुआ भोक्रे, हाडी भोक्रे, गौरव काटरे, सुनीता काटरे, सुशीला काटरे, जय काटरे, वर्षा काटरे, ऋषभ टोम्बरे, निर्मला मुसाडे, आणि रोहित मुसाडे हे सर्वजण या संकटात सापडले होते.

श्रीकांत शिंदे यांनी दाखवलेली तत्परता, समजूतदारपणा आणि माणुसकीमुळे ही मंडळी आज त्यांच्या घरी परतली आहेत. आमदार प्रताप सरनाईक यांच्या पुढाकारामुळे त्यांना खास बसने वर्ध्याला रवाना करण्यात आले. मुंबई विमानतळावर उतरल्यावर त्यांची व्यवस्था करण्यात आली होती. सर्व यंत्रणा योग्यरीत्या काम करत होत्या, आणि या सगळ्याचं श्रेय जातं श्रीकांत शिंदेंच्या वेळी घेतलेल्या निर्णयांना.



या घटनेतून आपल्याला एक गोष्ट नक्की समजते – खऱ्या नेत्याची ओळख ही संकटाच्या वेळी होते. डॉ. श्रीकांत शिंदेंनी हे पुन्हा एकदा सिद्ध केलं की जबाबदारी म्हणजे केवळ पद नसलं, तर ती कृतीतून दिसावी लागते.

त्यांचं हे धाडस, संवेदनशीलता आणि झपाटलेपणा आजच्या राजकारणात प्रेरणादायी ठरत आहे. अशा खंबीर नेतृत्वामुळे सामान्य माणसाचा विश्वास टिकून राहतो. ही गोष्ट केवळ २२ लोकांची सुटका नसून, ही माणुसकीची जिवंत कथा आहे.

**–संपादक आशिष घुमे**

# पहेलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ गंगाखेड बाजारपेठ कडकडीत बंद

**गंगाखेड । प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहेलगाम येथे पर्यटनासाठी गेलेल्या निष्पाप नागरिकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ २४ एप्रिल रोजी सकल हिंदू समाज यांच्या वतीने परभणी जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर गंगाखेड शहरातील मुख्य बाजारपेठ तसेच उपबाजारपेठ राणीसावरगाव येथे कडकडीत बंद पाळण्यात आला.



या हल्ल्यात एकूण २६ पर्यटकांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. या अमानुष घटनेविरोधात गुरुवारी गंगाखेड तालुका पूर्णतः बंद ठेवण्यात आला. या बंदला हिंदू आणि मुस्लिम समाजबांधवांबरोबरच सर्वपक्षीय नेते, विविध सामाजिक संघटना आणि व्यापाऱ्यांनी सक्रिय पाठिंबा दिला.

बंद दरम्यान अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दुकाने, आस्थापना बंद ठेवण्यात आल्या होत्या. राणीसावरगाव उपबाजारपेठेतही संपूर्ण शुकशुकाटाचे वातावरण दिसून आले.सकाळी १० वाजता भगवती मंदिरातून शांततेत मोर्चा काढण्यात आला. हा मोर्चा दिलकश चौक, अहिल्यादेवी होळकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे तहसील कार्यालयावर नेण्यात आला, आणि तेथे तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.या मोर्चात हिंदू-मुस्लिम समाजबांधव, सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त तैनात केला होता.

# गुहा येथे श्री साई सच्चरित पारायण सोहळा उत्साहात सुरू

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील गुहा (जि. अहमदनगर) येथील तांभेरे रोडवरील वाबळे वस्तीतील श्री साईबाबा मंदिरात दि. १८ एप्रिल ते २५ एप्रिल २०२५ या कालावधीत साई सच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या पारायण सोहळ्याचे चौथे वर्ष असून, भाविक भक्तांत उत्साहाचे वातावरण आहे.

दररोज पूजा, आरती व विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. पारायण सोहळ्याला परिसरातील भाविक, भक्त आणि तरुणवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.

या सोहळ्याची सांगता शुक्रवार दि. २५ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक (नेवासा) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.या धार्मिक सोहळ्याला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन साई भक्तगण व समस्त वाबळे परिवार यांच्यातर्फे करण्यात आले आहे.



# अलिबागमध्ये ‘सिंधुरत्न करंडक’ जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धा

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे मार्ग सेवाभावी संस्थेच्यावतीने सिंधुरत्न करंडक जिल्हास्तरीय महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ४ मे रोजी चिंतामणराव केळकर विद्यालय, चेंढरे – अलिबाग येथे ही स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या संघाला रोख १५,०००/- व चषक, द्वितीय क्रमांकासाठी १०,०००/- व चषक, तर तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी अनुक्रमे ५,०००/- व चषक अशी बक्षिसे दिली जाणार आहेत. याशिवाय शिस्तबद्ध संघाला विशेष चषक देण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही. प्रथम नोंदणी करणाऱ्या १६ संघांना स्पर्धेत प्रवेश दिला जाणार आहे. नोंदणीची अंतिम तारीख ३० एप्रिल २०२५ असून, स्पर्धेचे उद्घाटन ४ मे रोजी सायंकाळी ४ वाजता होईल. स्पर्धेविषयी अधिक माहितीसाठी आणि नोंदणीसाठी खालील संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा: प्रकाश सोनवडेकर – ९४२११७११७९ जे. जे. पाटील (सहकार्यवाह, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन) – ९८२२४२७१०३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व पंचायत राज दिनानिमित्त लिंबेवाडीत स्वच्छता उपक्रम राबवला

**परभणी । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत लिंबेवाडीच्या वतीने गावात भव्य स्वच्छता उपक्रम राबवण्यात आला.या उपक्रमाअंतर्गत बौद्ध विहार, ग्रामपंचायत कार्यालय, हनुमान मंदिर, जिल्हा परिषद शाळा आणि गावातील प्रमुख रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. यासोबतच ओला व सुका कचरा वेगळा करणे, तसेच प्लास्टिक संकलनासारखे उपक्रमही राबवण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेमध्ये गावातील सर्व समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेषतः प्रल्हाद इमडे, साहेबराव पंडित, पांडुरंग पंडित, अंतराम पारवे, अंगद बुधवारे, सतीश बारगिरे, आशाताई, जयश्री पंडित आणि ग्रामविकास अधिकारी माधव पांचाळ यांनी सक्रिय सहभाग घेतला.स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत गावात स्वच्छ व सुंदर परिसर निर्मितीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमात सहभागी सर्वांचे जयंती समितीच्या वतीने हार्दिक स्वागत व अभिनंदन करण्यात आले.



# शहरातील भाजी विक्रेत्यांवर अन्याय होऊ देणार नाही–सुनील बापू सावंत यांचा इशारा

## सोमवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात आंदोलनाची तयारी

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहरातील श्री देवीचा रोड परिसरात अनेक वर्षांपासून भाजीपाला विक्री करून उपजीविका करणाऱ्या भाजी विक्रेत्यांवर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होत असलेली कारवाई बेकायदेशीर आहे. या विक्रेत्यांवर अन्याय होऊ देणार नाही, असा इशारा सावंत गटाचे नेते सुनील बापू सावंत यांनी दिला आहे.

आज सकाळी ११ वाजता सावंत गटाचे नेते सुनील बापू सावंत, संजय अण्णा घोरपडे, बबनराव चाँदगुडे, गणेश शिंदे यांच्यासह नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी उपअभियंत्यांना निवेदन दिले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित विक्रेते नगरपरिषदेच्या जागेत अधिकृत ठेकेदाराकडून पावती फाडून जागेचे भाडे भरून व्यवसाय करीत आहेत. तरीही दोन दिवसांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या विक्रेत्यांवर बसू नये असा दबाव टाकण्यात येत आहे. या भागात वाहतुकीस अडथळा होत नसल्याची माहिती असून, स्थानिक नागरिकांची कोणतीही तक्रार नाही. काही राजकीय व्यक्ती स्वार्थासाठी तक्रारी करून या विक्रेत्यांवर अन्याय करत आहेत, असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. जर ही कारवाई थांबवली नाही, तर सोमवारी सकाळी ११ वाजता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर भाजी विक्रेते अनोखे आंदोलन करणार असल्याचा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.या निवेदनावर छाया सिरसट, शब्बीर बागवान, अन्वर शेख, सविता भुजबळ, सुनील अडसूळ, ज्योती चिंचकर, पांडुरंग जगदाळे, सोहेल बागवान, रेश्मा राखुंडे, अश्विनी चांदगुडे, चिमण शिरसागर, तृप्ती रोडगे, आयान बागवान, लता शेळके, सतीश रोडगे, विरार पठाण, लतिफा लियाकत शेख, मनीषा थिटे आदींच्या सह्या आहेत.सदर निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, कार्यकारी अभियंता अकलूज, तहसीलदार करमाळा आणि पोलीस निरीक्षक करमाळा यांना देण्यात आल्या आहेत.

# पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा बदलापुरात तीव्र निषेध




**बदलापूर । प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याचा बदलापूर येथील घोरपडे चौकात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या वेळी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तान समर्थित अतिरेक्यांनी धर्म विचारून पर्यटकांवर गोळीबार केला. या अमानुष हल्ल्यात २६ हून अधिक निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये महाराष्ट्रातील सहा नागरिकांचाही समावेश आहे, ही बाब अधिक वेदनादायक ठरली.या पार्श्वभूमीवर सकल हिंदू समाजाच्या वतीने कात्रप, बदलापूर येथे घोरपडे चौकात एकत्र येऊन निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी केंद्र सरकारने कठोर पावले उचलून दहशतवाद्यांना ठोस प्रत्युत्तर द्यावे, अशी जोरदार मागणी केली.या निषेध सभेला आमदार किसन कथोरे, राजेंद्र घोरपडे, संभाजी शिंदे, संजय भोईर, किरण भोईर तसेच अनेक भाजप कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपबाजारपेठेत सायबर गुन्हेगारी/ऑनलाईन फसवणुकीबाबत बँक अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलू व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने आज गुरुवारी (ता. २४ एप्रिल) बाजार समितीच्या सभागृहात सायबर गुन्हेगारी आणि ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव व सुरक्षित आर्थिक व्यवहारांबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.या वेळी भारतीय स्टेट बँक, सिंदी शाखेच्या व्यवस्थापक पल्लवी हरले यांनी बाजार समितीतील शेतकरी, व्यापारी, व मजूर वर्गाला अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले. सायबर फसवणूक टाळण्यासाठी काय काळजी घ्यावी, फसवणूक झाल्यास तातडीने कोणत्या पद्धतीने तक्रार करावी, याची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

ठइख च्या सूचनेनुसार '१९३०' या क्रमांकावर नशी ऋख्ठ नोंदवता येते. जर २४ तासांत तक्रार केल्यास १००% रक्कम परत मिळू शकते; तर ४८ तास ते ५ दिवसांच्या आत तक्रार केल्यास ५०% रक्कम परत मिळू शकते. तसेच गुगलसारख्या सर्च इंजिनवर टोल-फ्री क्रमांक शोधण्याऐवजी बँकेच्या अधिकृत कागदपत्रांवरील क्रमांकांचा वापर करावा, असेही त्यांनी सुचवले.बाजारातील घटक वर्ग मोठ्या मेहनतीने कमावलेला पैसा बँकेत सुरक्षित ठेवतो, मात्र हायटेक चोर सायबर माध्यमातून फसवणूक करत आहेत. त्यामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांनी सजग व सतर्क राहणे गरजेचे आहे, असे आवाहनही हरले यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाला बाजार समितीचे सभापती केशरीचंद खंगारे, उपसभापती प्रमोद आदमने, संचालक मंडळ, सचिव महेंद्र भांडारकर, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सौ. निशा काकडे, त्यांचे कार्यालयीन कर्मचारी तसेच बाजार समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भारत विद्यालय हिंगणघाट येथे उन्हाळी छंद शिबीराचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**




विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी उपयुक्त आणि सर्जनशील ठरण्याच्या हेतूने भारत विद्यालय, हिंगणघाट येथे दिनांक २८ एप्रिल ते ०७ मे २०२५ या कालावधीत सकाळी ७.३० ते १०.०० या वेळेत उन्हाळी छंद शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही विद्यालयामार्फत विविध उपक्रम आणि शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या वर्षीच्या शिबिरात विद्यार्थ्यांना कला व हस्तकला, मैदानी खेळ, योग, मातीकाम, ब्लॉक पेंटिंग, गीत-संगीत, अक्षरलेखन, नृत्य आणि संगणक ज्ञान अशा अनेक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.या शिबिराचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासोबतच त्यांच्या छंदांना वाव देणे आणि कलागुणांना प्रोत्साहन देणे हा आहे. हे शिबीर म्हणजे केवळ मौजमजा नसून, जीवन कौशल्ये आत्मसात करण्याची एक अनोखी संधी आहे.वर्ग ४ ते ७ पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी हे शिबीर खुलं असून, निशुल्क आहे. भारत विद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच शहर आणि तालुक्यातील इतर शाळांमधील विद्यार्थीही या शिबिराचा लाभ घेऊ शकतात.शाळेचे मुख्याध्यापक हरीश भट्टड, उपमुख्याध्यापक किशोर चवरे, पर्यवेक्षिका निलांक्षी बुरीले आणि मनीषा कोंडावर यांनी विद्यार्थ्यांनी या सुवर्णसंधीचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## ट्रक अपघातात चालकाचे दोन्ही पाय निकामी

# आमदार राजेश बकाने यांची घटना स्थळी धाव घेत अपघातग्रस्तास मदत

**देवळी । प्रतिनिधी**



बुधवार (ता. २३ एप्रिल) रात्री ११ वाजताच्या सुमारास बुट्टीबोरी-तुळजापूर महामार्गावरील सेलसुरा जवळील रेल्वे क्रॉसिंगजवळ एक भीषण अपघात घडला. ओडिशाहून लोखंडी रॉड घेऊन कोल्हापूरकडे निघालेला ट्रक (चक१३ ऊट ५७७८) अनियंत्रित होऊन नव्याने बांधण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या भिंतीवर जाऊन धडकला.

ट्रक चालक शंकर खुशाल कदम आणि कंडक्टर एकनाथ शंकर देवराय (दोघेही रा. कवळी, ता. हदगाव, जि. नांदेड) या अपघातात गंभीर जखमी झाले. झोप लागल्यामुळे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याचे सांगितले जात आहे. या अपघातात चालकाचे दोन्ही पाय निकामी झाले आहेत.घटनेची माहिती मिळताच देवळी-पुलगावचे आमदार राजेश बकाने तातडीने घटनास्थळी पोहोचले. त्यांनी रुग्णवाहिका आणि पोलिस यंत्रणांना सूचना देत नागरिकांच्या मदतीने अडकलेल्या चालकाला बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले. जवळपास दोन तासांच्या प्रयत्नांनंतर चालकास बाहेर काढून सावंगी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या मदत कार्यात आमदार बकाने स्वतः नागरिकांसोबत दोन तास घटनास्थळी उपस्थित राहून सहभागी झाले. अपघातग्रस्तांवर सध्या उपचार सुरू असून, चालकाची प्रकृती चिंताजनक आहे.

# काश्मीरमधील पहलगाममधील झालेल्या भ्याड हल्ल्याचा भाजपकडून निषेध



**देवळी । प्रतिनिधी**

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा भारतीय जनता पार्टी देवळी शहर मंडळाच्या वतीने तीव्र निषेध नोंदवण्यात आला. यानिमित्ताने तहसीलदार, देवळी यांच्याकडे निवेदन सादर करून दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

या हल्ल्यात धर्म विचारून २६ हिंदू नागरिकांची निर्घृण हत्या करण्यात आली असून, यामुळे देशभरात संतापाची लाट उसळली आहे. या अतिरेकी हल्ल्यामागील कट रचणाऱ्यांवर आणि मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी भाजप कार्यकर्त्यांनी केली.निवेदन सादर करताना भाजपचे देवळी शहराध्यक्ष उमेश कामडी, माजी शहराध्यक्ष रविंद्र कारोटकर, माजी न.प. उपाध्यक्ष नरेंद्रजी मदनकर, अंकित टेकाडे, संजय मुजबैले, खेमचंद कावळे, शरदराव आदमने, दिवाकर झाडे, मोहन तेलरांधे, अमोल काकडे, रमेश सातपुते, डॉ. श्रावणजी साखरकर, संदीप पिंपळकर, दिलीप खाडे, गणेश पिंपळकर, योगेश आदमने, अमित राऊत, स्वप्नील मोटघरे, उज्वल देशमुख, पुरुषोत्तम कुहाटे, नाना दुरगुडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रमाणपत्रांसाठी संचिका तयार ठेवा; वेळेत सेवा देण्यासाठी महसूल विभाग कटिबद्ध-लतीफ पठाण

**पिशोर । जावेद शेख**




विद्यार्थ्यांना व नागरिकांना आवश्यक प्रमाणपत्रे वेळेत व अचूक मिळावीत, यासाठी परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच संबंधित कागदपत्रांची संचिका महसूल विभागाकडे सादर करावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांनी केले.जात, वय, राष्ट्रीयत्व, उत्पन्न, नॉन क्रिमिलियर, स्मशानभूमी, रस्ते मोकळे करणे, जिवंत सातबारा, सलोखा योजना आदी प्रमाणपत्रे तत्काळ देण्यासाठी महसूल प्रशासन सज्ज आहे, असेही त्यांनी सांगितले.

त्यांनी भराडी येथील स.भु. प्रशालेत पार पडलेल्या छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरा दरम्यान मार्गदर्शन केले. शिबिरात विद्यार्थ्यांसह शेतकरी, शेतमजूर, विधवा, वयोवृद्ध, निराधार, दिव्यांग व राशनकार्डधारकांच्या अडचणींचे निराकरण करण्यात आले.

पठाण म्हणाले, कुठलाही आर्थिक व्यवहार करू नये, दलालांपासून सावध राहा. आम्ही केवळ कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेतो व वेळेत सेवा पुरवतो.तहसीलदार संजय भोसले म्हणाले, जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्या निर्देशानुसार, नागरिकांना वेळेत सेवा मिळावी म्हणून महसूल विभाग सजग आहे. विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रक व आधारकार्डवरील स्पेलिंग यामधील तफावत टाळावी.

नायब तहसीलदार बळीराम मुंडे, मंडळ अधिकारी शंकर जैस्वाल, ग्रामपंचायत सदस्य अनिस पठाण, उपसरपंच गजानन महाजन, प्राचार्य आर. गायकवाड, माजी सरपंच रघुनाथ पांडव, ग्रामविकास अधिकारी पवार, अमोल शेळके, दुर्गेश गिरी, नरेश कुलकर्णी, ग्राम महसूल अधिकारी पोपट तायडे, रुक्मिणी माने, सुनिता गरुड, दीपक जगताप, प्रभाकर कुलकर्णी, सुरज लांडकर, जगदीश निकम, विष्णू बोरसे, दत्तात्रय बिडवे, प्रमोद शेजुळ, कडुबा राकडे, रफिक भाई, संदीप खोमणे, अनिल काळे, सिनकर, बोराडे, ज्ञानविकास विद्यालय व स.भु. प्रशालेचे शिक्षकवृंद, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविकरुक्मिणी माने यांनी केले आभार प्रदर्शन: श्रप्रा. मादळे

# मोर्चापुर येथे आर्थिक विवंचनेतून २८ वर्षीय तरुणाने घरीच घेतला गळफास, सेलू पोलिसांत मर्ग दाखल



**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

तालुक्यातील मोर्चापुर येथे आर्थिक विवंचनेतून नैराश्यग्रस्त झालेल्या २८ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (ता. २४ एप्रिल) सकाळी १० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

प्राप्त माहितीनुसार, मृतक तरुण हा आई व भावासोबत मोर्चापुर येथे वास्तव्यास होता. त्याचा साउंड डेकोरेशनचा व्यवसाय होता. व्यवसाय वाढवण्यासाठी त्याने खासगी बँकेकडून सुमारे १० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र व्यवसायात सतत तोटा झाल्याने तो गंभीर आर्थिक अडचणीत सापडला होता.

गुरुवारी सकाळी घरात कोणी नसल्याचे पाहून त्याने दोरीने गळफास लावून जीवन संपवले. काही वेळाने आई घरी परतल्यावर तिला ही घटना दिसून आली. तिच्या आरडाओरडीनंतर शेजाऱ्यांनी तातडीने याची माहिती सेलू पोलिसांना दिली.पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, सेलू येथे पाठविण्यात आला. पुढील तपास सेलू पोलीस करीत आहेत.

# पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा झाडगाव येथे कँडल मार्चद्वारे निषेध




**झाडगाव । प्रतिनिधी**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दिनांक २२ एप्रिल रोजी झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यासाठी झाडगाव येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेना शाखा आणि गावकऱ्यांच्या वतीने कँडल मार्च काढण्यात आला. या वेळी हल्ल्यात बळी पडलेल्या निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.मनसे जिल्हाध्यक्ष शंकरभाऊ पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या मोर्चात हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे हल्ल्यामागील दहशतवादी संघटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

या वेळी मनसे सर्कल अध्यक्ष नितीन परतेकी, उपाध्यक्ष गजानन शिरपूरकर, सचिव नितीन दाभेकर, संघटक नितेश टापरे, गणेश नेहारे तसेच झाडगाव येथील नागरिक गजानन कुरटकार, दिलीप भुतकर, सूरज तेलंग, योगेश नेहार, सचिन परतेकी, अमर व्यापारी, सतीश कोडापे आदी उपस्थित होते.गावातील महिला वर्गही मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. श्रद्धा डंभारे, कल्पना राऊत, ज्योती ढभाले, नेहा परतेकी, रंजना नेहारे, चंद्रकला जांभरे, अर्चना कोडापे यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत भारत कृषक समाजाकडून केंद्रीय कृषीमंत्र्यांना निवेदन सादर



**नागपूर । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्या, त्यांच्या समस्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांचे नियोजन याबाबत केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आणि कृषी राज्यमंत्री भागीरथ चौधरी यांना भारत कृषक समाज महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. प्रकाश मानकर, उपाध्यक्ष डॉ. रमेश ठाकरे यांनी दिल्ली येथे निवेदन दिले. त्यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या थांबवण्याबाबत काही महत्त्वाचे मुद्दे चर्चेत आले. ज्यात संपूर्ण कर्जमाफी, एमएसपीमध्ये वाढ, भावांतर योजना, शेती अवजारे, खते, बियाणे, औषधे इत्यादींवर जीएसटी लावणे थांबवावे किंवा दिलेला जीएसटी शेतकऱ्यांना परत करावा, सरकारने पीक विमा योजना स्वतः चालवावी, रोजगार हमी योजना शेतकऱ्यांच्या शेतात राबवावी. त्याचप्रमाणे दरवर्षी सरकार वेगवेगळे धान्य खरेदी करते आणि त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो आणि शेतकऱ्यांनाही त्रास दिला जातो, म्हणून ही योजना बंद करावी आणि त्याऐवजी भावांतर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना फरक देण्यात यावा. दरवर्षी गोदामे, बारदाने लागतात. तसेच या योजनेसाठी सरकारला मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची पण आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे याबाबत कृषीमंत्र्यांशी सविस्तर चर्चा झाली आणि त्यांनी याबाबत सकारात्मक दृष्टिकोन दाखवला.

# राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा पदवीदान समारंभ संपन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

वाढता उत्पादन खर्च, मर्यादित बाजारपेठ प्रवेश आणि अपुरी भावनिश्चिती प्रणाली यामुळे कृषी क्षेत्र अधिक अडचणीत येत असतांना भारतीय शेतीला शाश्वत, आर्थिक लाभाची आणि भविष्यासाठी सक्षम व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी कृषी विद्यापीठांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी केले.राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या ३८ व्या पदवीदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाला विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय कुमार, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. नितीन दानवले आदी उपस्थित होते.
राज्यपाल म्हणाले, हवामान बदलांना तोंड देणाऱ्या पिकांच्या जाती विकसित करून, सेंद्रिय शेती, समग्र अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि सूक्ष्म सिंचनाचा प्रसार करून कृषी विद्यापीठे हवामान बदलांचे परिणाम कमी करण्यात आणि उत्पादकता वाढवण्यात मदत करू शकतात. कृषी पदवीधरांनी स्थानिक घटक लक्षात घेऊन पिकांचे वाण विकसित करावे. विद्यापीठांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि अचूक शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांसारख्या डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना योग्य वेळी आवश्यक माहिती पुरविणे गरजेचे आहे. कृषी प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन आणि कृषी मूल्य साखळी विकसित करणेही महत्वाचे आहे.अधिक उत्पन्न देणारी आणि पोषणमूल्यांनी भरलेली पिके विकसित करणे हे कुपोषणाला थोपवण्यासाठी आणि अन्न व पोषण सुरक्षेची हमी देण्यासाठी अत्यावश्यक आहे. नवोपक्रम, शिक्षण आणि शाश्वत पद्धतींच्या माध्यमातून भारतीय शेती तिच्या अडचणींवर मात करून यशस्वी होऊ शकते. कृषी पदवीधरांनी विज्ञान-तंत्रज्ञानाच्या साह्याने या आव्हानांना




सामोरे जाऊन आधुनिक कृषी पद्धती विकसित करावी अशी अपेक्षा श्री. राधाकृष्णन यांनी व्यक्त केली.
राज्य शासन शेतीतील नवोपक्रम, उद्योजकता आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारे परिसंस्थेचे निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. आर्थिक सहकार्य , प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा प्रदान करणाऱ्या विविध कार्यक्रमांद्वारे शेती क्षेत्रातील पुढील नेतृत्व घडविण्याचे प्रयत्न असल्याचेही ते म्हणाले. कृषी क्षेत्राची आणि विद्यापीठाच्या गरजा लक्षात घेण्यासाठी तीन दिवस विद्यापीठात मुक्काम करणार असल्याचे श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी विविध पिकांच्या जाती आणि तंत्रज्ञान विकसित करण्याचे प्रशंसनीय कार्य केले आहे. डिजिटल शेतीच्या क्षेत्रात विद्यापीठाची झालेली प्रगती ही एक भूषणावह बाब आहे. विद्यापीठाचा हा पुढाकार शेतकरी समुदायापर्यंत विकसित झालेली तंत्रज्ञान आणि माहिती सहज आणि आकर्षक पद्धतीने पोहोचवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे गौरवोद्गार राज्यपालांनी काढले.कृषी मंत्री ॲड.कोकाटे म्हणाले, वातावरणतील बदलामुळे शेतीवर विपरीत परिणाम होतं आहे. यावर मत करण्यासाठी कृषी क्षेत्रात आमुलाग्र बदल करून नावे तंत्रज्ञान स्वीकारावे लागेल. कमी खर्चात नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक उत्पादन घेण्याचे प्रयत्न करावे लागतील. नव्या कल्पना, नैसर्गिक शेती, कृषी यांत्रिकीकरण, कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती पद्धतीत बदल घडवून आणावे लागतील. फलोत्पादन आणि उत्तम गुणवत्तेचे उत्पादन करून निर्यातीवर भर देणेही गरजेचे आहे. विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तारामध्ये भरीव योगदान द्यावे आणि कृषी पदवीधरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग कृषी क्षेत्राच्या उन्नतीसाठी करावा असे आवाहन कृषीमंत्र्यांनी केले. राज्य शासन विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यामाध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कायमच कटीबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. डॉ. संजय कुमार म्हणाले, कृषी उद्योजकतेला आणि कृषी पर्यटणाला चालना देण्याची गरज आहे. कृषी स्नातकांनी भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी निर्भयपणे नाविन्याचा पर्याय निवडावा. कार्यक्षम अशी मूल्य साखळी तयार करावी, कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी बायोमॅन्युफॅक्चरिंग हब तयार करावे. कृषी उत्पादनाच्या ब्रॅण्डिंगला प्रोत्साहित करावे. बाजारपेठेत प्रवेशासाठी विविध आउटलेट किंवा कृषी उत्पादनांचे मॉल तयार करावे. सन २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी योगदान देण्याचे आणि अन्न सुरक्षेसोबत शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.कृषी आधारित क्षेत्रात महाराष्ट्राचा १३ टक्के वाटा असून ऊस, कापूस, द्राक्ष, डाळी आणि आंबा उत्पादनात महाराष्ट्र अग्रेसर आहे. मात्र दुष्काळ, पाण्याचे दुर्भीक्ष आणि असामान्य पर्जन्यमान सारख्या समस्यांना राज्याला सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर हवामान-प्रतिरोधक पिकांची निर्मिती, पाण्याचा कार्यक्षम वापर निश्चित करण्यासह प्रगत कृषि पद्धतींचा प्रचार करून या आव्हानांना सामोरे जाण्यात महत्त्वाची भूमिका महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे बजावत असल्याचेही त्यांनी सांगितले.कुलगुरू डॉ.गडाख यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. ते म्हणाले, विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तार या तीनही क्षेत्रात देदीप्यमान कामगिरी केली आहे. शेतकऱ्यांना उपयुक्त असलेल्या १ हजार ८६६ तंत्रज्ञान शिफारशी, विविध पिकांच्या ३११ वाणांची निर्मिती आणि ५१ कृषी अवजारे व यंत्रांची निर्मिती विद्यापीठाने केली आहे. राहुरी कृषी विद्यापीठाने विकसीत केलेल्या ऊस, डाळिंब, हरभरा, रब्बी ज्वारी, कांदा, भात, लिंबू व बाजरी या प्रमुख ८ पीकांच्या वाणांचे आर्थिक विश्लेषण केले असता या ८ पिकांच्या वाणामुळे आजपर्यंत राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये ढोबळमानाने एकुण २ लक्ष ४० हजार १८८ कोटी व निव्वळ ३२ हजार २० कोटी रुपये इतक्या महसुली उत्पन्नाची भर पडली आहे. विद्यापीठाने कृषी संशोधनाला चालना देण्यासाठी विविध नामांकित संस्थांशी सामंजस्य करार केले आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.पदवीदान समारंभात गेल्या वर्षातील विविध विद्याशाखांतील एकुण ५ हजार २०१ स्नातकांना पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवीने राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याद्वारे अनुग्रहित करण्यात आले. त्यात विविध विद्याशाखातील ४ हजार ८३० स्नातकांना पदवी, ३३१ स्नातकांना पदव्युत्तर पदवी तर ४० स्नातकांना आचार्य पदवी संपादन केली आहे. यावेळी पीएच.डी.च्या ८ विद्यार्थ्यांना सुवर्ण, पदव्युत्तर पदवीच्या १९ विद्यार्थ्यांना सुवर्ण, पदवीच्या ९ विद्यार्थ्यांना सुवर्ण व दोन विद्यार्थ्यांना रौप्य पदके प्रदान करण्यात आली.जिल्हाधिकारी श्री. पंकज अशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आशिष येरेकर, अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला यांच्यासह विद्या परिषदेचे सदस्य व स्नातक यावेळी उपस्थित होते.

# राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात जिल्ह्याला तीन पुरस्कार

**मुंबई । प्रतिनिधी**

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात जिल्ह्याला तीन पुरस्कार प्राप्त झाले असून सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तत्कालिन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, देवळाली प्रवरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी विकास नवले आणि राहता येथील मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यावेळी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित होते.
जिल्ह्यात अवैधरित्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करणाऱ्या उपक्रमाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. २०२३-२४ च्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानांतर्गत तत्कालिन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी यांना



पुरस्कार प्रदान करण्यात आला.२०२४-२५ साठी शासकीय अधिकाऱ्यांमध्ये देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विकास नवले, तर शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये राहाता येथील मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांनाही प्रत्येकी ५० हजार रुपयांचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला.तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी कामकाजात संगणकीय प्रणालीच्या उपयोगावर भर दिला. जिल्हा प्रशासनाने गौणखनिज, ई रेकॉर्डस, इक्युजे कोर्ट प्रणाली, ई ऑफीस, 'जलदूत' पाणी टंचाई व्यवस्थापन, भुसंपादन यासारख्या अनेक उपक्रमांमध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर केला.मंडळ अधिकारी मोहसीन शेख यांच्या महसूलविषयक पुस्तकांच्या राज्यातील पहिल्या क्युआर कोड वाचनालयासाठी त्यांना पुरस्कृत करण्यात आले. अधिकाऱ्यांनी लिहिलेली ११ पुस्तके नागरिकांसाठी क्युआर कोडच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहेत.देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विकास नवले यांच्या मार्गदर्शनाखाली देवळाली प्रवरा नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहरालगतच्या ३० गावांसाठी सक्शन मशिनद्वारे मैला उपसा व गाळ व्यवस्थापन यासाठी पंचायत समिती राहुरी व संबधित ३० ग्रामपंचायती यांच्याशी करारनामा केला. यामुळे ग्रामीण व शहरी स्वच्छता सुधारण्यास मदत होणार आहे.

# दौऱ्यात व्यस्त, भर उन्हात रस्त्यावर गाडी थांबवून बाप-लेकीची भेट



**मुंबई । प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे या सातत्याने आपल्या मतदारसंघाच्या दौऱ्यावर असल्याचे पाहायला मिळते. तर शरद पवार यांचे वय झाले असले तरी ते देखील कामानिमित्त दौऱ्यावर असतात. अशातच असे दौरे सुरू असताना बाप-लेकीची अनेकदा बाहेरच भेट होते.
इंदापूर येथील दौरा अटपून पुरंदरच्या दिशेने जात असताना सुप्रिया सुळे यांनी रस्त्यातच शरद पवार यांनी भेट घेतली. शरद पवार आणि प्रतिभाताई पवार हे बारामतीला जात होते. त्याच वेळेला शरद पवार यांची गाडी पाहिली. ही गाडी दिसताच सुप्रिया सुळे आपल्या गाडीतून उतरून शरद पवार आणि प्रतिभाताई पवार बसलेल्या गाडीच्या दिशेने गेल्यात. यानंतर सुप्रिया सुळेंनी दोघांची भेट घेतली. शरदचंद्र पवार गटाचे शरद पवार आणि सुप्रिया सुळे हे दोघेही सध्या दौऱ्यावर आहेत. हे दौरे सुरू असताना मोरगाव येथे रस्त्यातच पवार कुटुंबातील बाप-लेकीची भेट झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी दोघांमध्ये काही क्षण काहीतरी संवाद झाला.

# राज्यातील मच्छीमार बांधवासाठी सरकारचा गेम चेंजर निर्णय, कोणते फायदे होणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मत्स्य व्यवसायाला शेतीचा दर्जा मिळाल्याने राज्यातील मच्छीमारांना मोठा दिलासा मिळाला आहे. यामुळे त्यांना वीज बिलांमध्ये सवलत, किसान क्रेडिट कार्ड सुविधा, कृषी दरांनुसार कर्ज, सौर ऊर्जेचे लाभ आणि ॲक्वाकल्चरसाठी मदत मिळणार आहे.महाराष्ट्रातील मत्स्य व्यवसाय आणि मच्छिमार बांधवासाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच मंत्रिमंडळ बैठक झाली. या मंत्रिमंडळ बैठकीत मत्स्य व्यवसायाला अखेर कृषी दर्जा प्रदान करण्यात आला आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे राज्यातील मच्छीमार बांधवांना मोठा दिलासा मिळाला आहे.या निर्णयाबद्दल कोळी बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर कोळी बांधवांनी आज मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले आहे. मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा मिळाल्याने आता मच्छीमार बांधवांना अनेक महत्त्वपूर्ण फायदे मिळणार आहेत. या निर्णयामुळे मच्छीमारांना शेतकऱ्यांप्रमाणे वीज दरात सवलत मिळणार आहे. तसेच, किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. यासोबतच, कृषी दरांनुसार कर्ज मिळण्यास मच्छीमार आणि मत्स्य व्यावसायिक पात्र ठरणार आहेत.

**आर्थिक मदत मिळण्यास मच्छीमार पात्र**

त्यासोबतच आता मच्छीमारांना शेतकऱ्यांप्रमाणे सौर ऊर्जेच्या लाभांचाही लाभ घेता येणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून (उदा. ॲक्वाकल्चर मत्स्यशेती) मत्स्यशेती करण्यासाठी आर्थिक मदत मिळण्यास मच्छीमार पात्र ठरणार आहेत. याव्यतिरिक्त, शीतगृह सुविधा आणि बर्फ कारखान्यांसाठी अनुदानही उपलब्ध करून दिले जाणार आहे.या निर्णयामुळे निश्चितच राज्यातील मत्स्य व्यवसाय अधिक विकसित होईल. येत्या काही वर्षात महाराष्ट्र मत्स्य उत्पादनात पहिल्या तीन राज्यांमध्ये स्थान मिळवू शकेल, असा विश्वास



मंत्री नितेश राणे यांनी व्यक्त केला. हा निर्णय मच्छीमार बांधवांसाठी एक 'गेम चेंजर' ठरणार आहे.

**मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा मिळाल्यानंतर काय फायदे होणार?**

शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांना वीज दरात सवलत मिळेल.
किसान क्रेडिट कार्ड सुविधा उपलब्ध होईल.
कृषी दरांनुसार कर्ज सहाय्य मिळण्यास मच्छीमार पात्र होतील.
मत्स्यशेतीस अल्प दरात विमा मिळेल.
शेतकऱ्यांप्रमाणे सौर ऊर्जेचे लाभ मिळतील.
नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने (उदा. ॲक्वाकल्चर मत्स्यशेती) मत्स्यशेती करण्यासाठी मच्छीमार पात्र होतील.
शीतगृह सुविधेसाठी व बर्फ कारखान्यांसाठी अनुदान मिळेल.
मत्स्यव्यवसाय क्षेत्रामध्ये नीलक्रांती घडेल व तरुणांना रोजगार मिळेल.
उपकरणे व यंत्रे सवलतीच्या दरात उपलब्ध होतील.
सागरी व अंतर्गत मासेमारी क्षेत्रामध्ये आर्थिक विकास होईल.
मच्छीमारांना शासनातर्फे डिझेल पंप मिळतील.
राज्याच्या मत्स्य उत्पादनामध्ये वाढ होणार.
मच्छीमारांना मत्स्यबीज खरेदी, खाद्य खरेदी, पँडल व्हील एरेटरस, एअर पंप करीता अनुदान मिळणार.
नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांप्रमाणे मच्छीमारांना नुकसान भरपाई मिळणार.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .